(Marathi)

1036
9181

1350 14 P

82
1350 mar
IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED
MAR 1931

राष्ट्रीय पद्यमाला पुष्प ६ वें.

हिंदमाताकी जय.

# प्रभातफेरीसाठीं आणि मेळयासाठीं

संगीत

# राष्ट्रीय-पुष्प-गुंफा.




लेखक आणि प्रकाशक.

शंकर विठ्ठल महाद्वार, निपाणी

मुद्रकः—क. रा. आंबेवाडी यांनीं डी. आर. ठाकूर,
यांचेकरितां ' तरुण भारत ' छापखाना
बेळगांव येथें छापिलें.

शके १८५२

आवृत्ति १ ली. प्रती २०००

**किंमत अर्धा आणा.**


लवकरच प्रसिद्ध होणारी पुढील पुस्पें:—१प्रभात-गीत संग्रह. २ हिंद-गीत. ३ साम्राज्यशाहीचे रडगाणें. ४ स्वातंत्र्य-मंत्र.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
1350 12-7-72
GOVT. OF INDIA

# राष्ट्रीय पुष्प गुंफा.



## महात्मा गांधीकीजय.



प्रथम वंदूया गांधिजी प्रभूला ।
देह ज्यांनीं देशार्थ कष्टवीला ।
देईं देवा दीर्घायु सुयश त्याला ।
हीच आशा मम पुरवि बा ! दयाला ॥ १ ॥

### पद १ लें–ईशस्तवन ( चालः—नमन नटवरा० )

प्रणत शिवसुता विद्यादाता । मंगल मूर्ती सिद्धी नाथा ॥ ध्रु ० ॥शरण बालगण तुजशी आतां । त्वत्पदकमला ठेउनि माथा । पुरवि मनोरथ हे भगवंता । देईं त्वरित स्वातंत्र्य भारता ॥ शरण शारदा देवी कांता ॥ १ ॥ प्र० ॥

### पद २ रें. ( मोद हराचा प्रेम० )

विघ्न नाशका धांव सत्वरी । दास्य-पाश हा त्वरित निवारी ॥ ध्रु० ॥ पारतंत्र्य विस्तीर्ण सागरीं । आक्रंदे भूमाय बिचारी ॥१॥ धांव पावबा झडकरी । येईं येईं बा स्वकरिं धरी ॥२॥

### पद ३ रें ( गौरिसुता नमुंया )

गांधी मुनी नमुंया । सुजन हो । राष्ट्र-रक्षका । धर्म-पालका । राष्ट्रोद्धारा झिजवी काया ॥ ध्रु० ॥ मोहनदास महात्मा गांधी । हक्क रक्षितां झाला बंदी । शांति अहिंसा अभिनव युद्धीं । वंदन करुंया त्या प्रभुराया ॥ १ ॥

**पद ४ थें.** जागृतिपर ( देवा हजरत सलाम )

आतां झडकरि उठा सुजनहो ॥ धृ० ॥ दडपशाहिनें देश पेटला । झोपा कैशा घेतां आतां ॥ १ ॥ समर शांतता सिद्ध तुह्मांस्तव । काय बघत बसता हो आतां ॥ २ ॥ झ० ॥

**पद ५ वें.** ( परवशता पाश दैवें० )

परवशता पाशदावें तोडा अतां या क्षणा ॥ धृ० ॥ सजिवपणीं घडती सारे मरण भोग जाणा ॥ १ ॥ सौख्य भोग नुरले सारे कष्टमात्र नाना ॥ २ ॥ मातृभूमि वाटे सकला खचित बंदिखाना ॥ ३ ॥ असुनि खास मालक घरचे चोर ह्मणवितांना ? ॥ ४ ॥ करित हीच अंती विनंती हिंद बांधवांना ॥ ५ ॥ पर० ॥

**पद ६ वें.** ( निशिदिनिं मनिं० )

निशिदिनिं घरिं फिरवाच चरखा । चरखा देईल आरिल चरखा । भारत पीडक पळेल परका ॥ धृ० ॥ येउनि रिपु या हिंदुस्थानीं । छळ माजविला परकीयांनीं । धाडा ना ? त्या यमलोका ॥ १ ॥ ऐकुं न आल्या किंकाळ्या कां ? भूमातेच्या ऐका हाका । तारा या स्वस्थ बसुं नका ॥ २ ॥

**पद ७ वें** ( चाले वसंत राजा० )

निद्रा पुरे पुरे ती । व्हा जागृत प्रभाती ॥ धृ० ॥ राष्ट्राभिमान कांहीं । तिळही तुह्मांसि नाहीं ? । करण्यास्वराज्य चोरी । आलेत वैरि दारी ॥ १ ॥

**पद ८ वें.** ( स्वकुल तारक )

सतत भारत सुखा । जनहो । दक्ष असा ना फिरवित

चरखा ॥ धृ० ॥ सुखविला नच भारतमाता । ऐशा पतिता । स्थल यमलोकां ।। १ ॥ सतत० ॥

## पद ९ वें ( संशय का मनिं आला० )

उठ उठ भारत वीरा । अर्जुना । निद्रित कां रणशूरा ॥ धृ० ॥ आंग्ल पातले वैरी दारीं । हकलुनि दे त्या चोरा ॥ १ ॥ उठ० ॥

## पद १० वें ( सुटेना व्यसन दारूचें० )

पुरे ना ? काळ ही निद्रा । प्रभातीं उठ रे वीरा ॥ धृ० ॥ तुतारी ऐक गांधींची । सज्ज हो खोउनी कची ॥ लढाया शांतता—समरीं । अहिंसा शस्त्र घे स्व-करीं ॥ १ ॥

## पद ११ वें ( सांवळा वर बरा० )

झणिं उठा उद्धरा हिंद-भूला । दरवडा पातला आंग्ल घाला ॥ धृ० ॥ आत्मसंरक्षणा । शत्रुसंहारणा । दास्य भूमी-तला । गाढण्याला ॥ १ ॥ आधि खादी वरा । देशसेवा करा । एक निष्ठे स्मरा । भारताला ॥ २ ॥ सौख्य स्वातंत्र्य तें । भारता शोभतें । सज्ज होऊं उठा तेंचि घ्याया ॥ ३ ॥

## पद १२ वें ( धिःकार मन साहिना० )

या हिंद—भू—रक्षणा ॥ धृ० ॥ परदास्य शल्य तें । विष-समचि जीवना । स्वातंत्र्य घ्यायास सज्ज व्हा या क्षणा ॥१॥ बोलविति गांधी । निःशस्त्र युद्धीं । हा मार्ग बरवा । परदास्य हनना ॥ २ ॥ या. ॥

## पद १३ वें ( दे हाता या शरणांगता० )

या आतां या रणिं शांतता ॥ धृ० ॥ मम सकलहि

बंधुनो भगिनिनो झडकरि हो उठा । निश्चिंता ॥ या SSS ॥ सर्वथा चपल चरखा । देई हा अरिस चरका । परतवी शत्रु परका । म्हणुनिच करि विनंति ही अजि सकला नित फिरवा तया । घ्या हाता ॥ १ ॥

## पद १४ वें ( चंद्रिका ही जणुं० )

अजुनि कां झोंपला बंधुनो व्हा जागृत या क्षणीं । भगिनि बांधव आजला लागा भारत-रक्षणीं ॥ धृ० ॥ सौख्य कुठुनि? नच! हिंदुला आंग्लांनीं वेढियले । पाशा या तोडितां गांधिना कपटें धरिलें । बनिया वेषें पाहुणे आंग्ल हे भारति आले । आता सोकावले । म्हणविती घरचे धनी ॥ १ ॥ अजुनि का? झोंपला० ॥

## पद १५ वें न्याय देवतेचें रडगाणें ( काशि या त्यजूं० )

काशि या त्यजूं सुखाला । मम पंचप्राण भारत-भूला ॥ धृ० ॥ काशि देउं स्वर्ण भूमी । मग लोह काष्ट खाऊं का मी ॥ १ ॥ माझ्या० ॥ उपवाशि प्राण देण्यापेक्षां । मी लढत मारिन घ्याया देशा ॥ २ ॥

## पद १६ वें ( विनय हीन वदता नाथा० )

विभवपूर्ण सुखदा सत्ता । नाहिं मी अर्पित आतां ॥धृ०॥ रणवीरा रीती । ना शोभे व्रीडा ती । अमर जागि ही सत्ता ॥ १ ॥

## पद १७ वें ( सवतचि भासे० )

सवतचि भासे मला । भारत-भू या काला ॥ धृ० ॥ सत्याग्रहिचे शस्त्र अहिंसा । बोंचतसे हृदयाला ॥ १ ॥ सं.॥

## पद १८ वें ( किति किति सांगू तुला० )

किति किति सांगू तुला । मज धैर्य नसे ॥ धृ० ॥ हे युद्ध अहिंसो सांहूं कसे । या समयीं मला नच कोणी पुसे । हा सत्याग्रह मज भाजीतसे ॥ १ ॥ तो गांधी कुठोनी आला बरे । हे हिंदु नव्हेत वैरी खरें । मज " कोठें तरि जा " ह्मणती त्वरें ॥ २ ॥

## पद १९ वें वर्णनपर ( हृदयिं धरा )

हृदयिं धरा हा बोध खरा । शांति अहिंसा रणीं मरा ॥ धृ० ॥ कुटिल कपटि तें आंग्ल पहा । देउं नका ठाव जरा ॥ १ ॥ न्याय देवता अन्यायी । कवटाळिल ही भीती धरा ॥ २ ॥

## पद २० वें ( सत्य वदे वचनाला० )

सत्य वदे वचनाला गांधी । स्वराज्य मिळविन भारतभूला ॥ धृ० ॥ राष्ट्र परांकित मानी गतसम । स्वतंत्र करितो आधि मी त्याला ॥ १ ॥ शस्त्र अहिंसा सत्याग्रह मम । दाविन अनुपम अद्भुत लीला ॥ २ ॥ सत्य० ॥

## पद २१ वें ( खरा तो प्रेमा )०

खरा तो जन्मा सार्थकि धन्य जनीं ॥ धृ० ॥ भारत-हितरत भास्कर भासत । स्वार्थ त्याग करूनी ॥ १ ॥ दुःखी जन देखता । स्वसुखा त्यागोनिया जनभयहरण हेंचि सुख । जगिंया खचित जया । दर्शन भूमातेचे नाचवी प्रेमलहरी । वंदन ध्यान हेचि सुख हिंद पुत्र तो भुवनीं ॥ १ ॥ खरा० ॥

## पद २२ वें. ( युवति मना० )

सकल जना क्षेत्र तीर्थ समर शांतता झाले ॥ रणमरणा

सत्याग्रहि वीर सज्ज बहु वहिले ॥ धृ० ॥ करणी राणि हिंसा नच असहकार समरीं । शूर तोचि विजयि तोचि हे आचरणीं ज्या आले ॥ १ ॥ सकल ॥

## पद २३ वें ( प्रेम सेवा शरण० )

देश सेवा करुनि सुखवि निज भारता । हीच करित विनंति खास जनहो अता ॥ धृ० ॥ हिरवोनि स्वातंत्र्य । लादोनि दारिद्र्य । छळितात परकीय । शमवि असहायता ॥१॥

## हनुमस्तुति ] पद २४ वें [ ( मेरे मौला बुलाये० )

धांवे पावे देवा झणिं वायु-सुता । नको अंत बघू हनुमंता अतां ॥ धृ० ॥ भारतांतिल हिंदि जनता गेलि अवघी घाबरून । दुष्ट आंग्लाच्या भयानें वाट बघते तळमळून । हातीं घेई गदा लवलाहि अतां ॥ १ ॥

## पद २५ वें ( चरखा गीत, गज्जल. )

चरखा चला चलाके । लेंगे स्वराज्य लेंगे ॥ धृ० ॥ मल मल जो है विदेशी । आणे को गज मिलेंगे । खादी नही त्यजेंगे ॥ लेंगे स्वराज्य लेंगे० च० ॥ १ ॥ बहोत्तर करोड रुपिया परदेश जा रहा है । उसकू बचाबचाके । लेंगे० च०॥२॥ चरखोंकि घणघणाट । रणभेरियाँ बजेंगे । अंग्रेजको सुनाके ॥ लेंगे० च० ॥ ३ ॥ या हक्क है हमारा । तन जानसेभि प्यारा । मरने नहि डरेंगे ॥ लेंगे० च० ॥ ४ ॥ हम सब परेड फौजी । कप्तान हमारा गांधी । आज्ञा उसीकि लेंगे ॥ लें० च० ॥ ५ ॥ तेहत्तीस करोड फौजी । रणसाथ ए चलेंगे । गांधी हुकुम करेंगे ॥ लेंगे० च० ॥ ६ ॥ चरखाहि

तोफ बनेंगे । तकवा बने है बरची । गोलेसे सुत्रके हम् ॥ लें० स्व० च० ॥ ७ ॥ —कानिटकर.

**पद २६ वें** ( आधुनिक फॅशन ) मम बंधु सखा०

पाश्चात्य सर्व फॅशननीं देश बुडाला परतंत्र जहाला ॥धृ०॥

ती आर्य संस्कृती नुरली लीन शीलता । नच आर्य स्त्री अता ॥ बहु वक्र भांग काढुनि त्या छान कुंतला । हा थाट चालला ॥ १ ॥ नरनारि परी ऐट करी भेद कोठला । अति डौल वाढला । करिं छत्रि घरीं स्वार परी सायकली-वरी । निघे दौड स्कूलला ॥ २ ॥ ते अर्ध बाहु शोभविते बटन पोलके । दिसे मडम सारिखे । करिं रिस्ट वॉच शोलकेच कंकणाहुनी । ह्मणे योग्य स्त्रियाला ॥ ३ ॥ हा काल कसा उलटियला सांगु कशाला । ठावेच जगाला । येतेच मी फिरूनि अता हेंच पतीला । ह्मणे ठेव चहाला ॥ ४ ॥ किति वानुं अणी कीर्ति जनीं पुरुष ते भले । जगि धन्य जाहले । तो क्रॉप कसा भांग जसा छान शोभला । स्त्रियाहूनि चांगला ॥ ५ ॥ ते शर्ट कोट बूट प्यॅान्ट चुरुट शोभती । सिगारेट मुखीं ती । परि त्यावरिहि उष्ण चहा प्राशिती पहा । ह्मणुं काय तयांला ॥ ६ ॥ त्या दुर्व्यसनीं लोळुनि निज देश दरिद्री । दिसे आज भिकारी । या भारतास तारि तर ऐट ती दुरि । करी सर्व सत्वरी ॥ ७ ॥

**समाप्त.**

---


**आमचेकडे मिळणारी राष्ट्रीय पुस्तकें:—**

खादी गीत ०॥. चहाचें खूळ ०॥. फॅशन-पुराण ०॥. राष्ट्रीय पद्यहार ०— राष्ट्रीय-पुष्प--गुंफा ०॥.